
2019-20

Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-IX, Issue-I
January - March - 2020
Marathi Part - III, Hindi & English

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मौलिक राष्ट्रजागरण<br>**डॉ. स्मिता मनोहरराव जाधव** | ४८-५३ |
| १४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा भजनातील सांगेतिक प्रयोग<br>**प्रा. डॉ. सोपान सिताबराव वतारे** | ५४-५५ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा साहित्यविषयक दृष्टिकोण<br>**प्रा. दिलीप घोनमोडे** | ५६-६१ |
| १६ | वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाजप्रबोधनातील भजनप्रभाव<br>**प्रा. डॉ. राजीव बोरकर** | ६२-६५ |
| १७ | राष्ट्रसंताची खंजेरी भजने, अमुल्य योगदान<br>**प्रा. संतोष मुकिंदा धंदरे** | ६६-६७ |
| १८ | राष्ट्रसंतांचे स्त्री सबलिकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**डॉ. माधुरी ना. कोकोड** | ६८-७० |
| १९ | राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टिकोन आणि सकारात्मक समाज प्रबोधन<br>**वैखरी वझलवार** | ७१-७४ |
| २० | राष्ट्रसंत तुकडोजींचे महिला सबलीकरण व स्त्री उन्नतीचे विचार<br>**डॉ. सिद्धार्थ बुटले** | ७५-७७ |
| २१ | राष्ट्रसंतांची खंजरी भजनातून समाजजागृती<br>**प्रा. डॉ. सुधाकर वि. भुयार** | ७८-८० |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २१. राष्ट्रसंतांची खंजरी भजनातून समाजजागृती

**प्रा. डॉ. सुधाकर वि. भुयार**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी, जि. वर्धा.

वं. राष्ट्रसंतांचे खंजरी भजन हा जीव की प्राण होता. जसे कृष्णाने आपल्या मधुर बासरीने सर्वांना मोहित केले असल्याचे सर्वज्ञात आहे. तसेच 'भुलविले वेणू नादे' कसे असावे याची प्रचिती राष्ट्रसंताच्या खंजरीतून येते. असे म्हणतात की, देव भक्ती ही देशभक्ती शिवाय खरी ठरत नाही आणि देशभक्ती देवभक्ती शिवाय पुर्ण होत नाही असा संदेश त्यांनी आयुष्यभर आपल्या कृतीतून दिला.

राष्ट्रसंतांच 'खंजरी भजन' ही एक स्वतंत्र निर्मिती असल्याने यामध्ये शब्दाला अतिशय महत्व दिसते. ते जेव्हा भजन म्हणत असे तेव्हा त्यांचा टाळ, तबला हा हळूवार होत असे, या टाळावरच त्यांची खंजरी दुमदुमायची या त्यांच्या प्रभावी पध्दतीमुळे त्यांची खडया आवाजातील भजने प्रत्येक क्षणाला जनमानसाचा पगडा घेत असे. स्वांतत्र्याच्या आंदोलनात त्यांच्या भजनाने प्रसिध्द् असलेल्या आष्टी, चिमूर मध्ये क्रांती घडवून आणल्या गेली

'आब काहेको धूम मनाते हो—दुखवाकर भारत सारे, आते है नाथ हमारे' या भजनात ते म्हणतात –

झाड झडुले शस्त्र बनेंगे । भक्त बनेगी सेना ।
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे । नाव लगेगी किनारे ।। १ ।।

या त्यांच्या प्रभावी भजनातून आष्टी, चिमूरची क्रांती तर झालीच सेवाग्राम आश्रमात महात्मा गांधींचे जे मौन व्रत होते तेव्हा राष्ट्रसंत भजन गात असतांना ते असे म्हणतात –

किस्मतसे राम मिला जिनको, उसने यह तिन गजह पाई ।। धृ ।।

अशा त्यांच्या आध्यात्मिक अर्थाच्या भजनांवर महात्मा गांधी बोलून गेले ''महाराजजी और कहो'' असे म्हणताच बापूंचे मौन तुटले असल्याचे सर्वांच्या ज्ञात आहे.

राष्ट्रसंतांच्या भजनात अशाच एका गर्दीचा प्रसंग नाशिकच्या कुंभमेळयात सुमारे अडीच ते तीन लाख लोकांच्या साक्षीने पुर्ण झाल्याचे दिसते. कुठेही त्यांची भजने घ्यायची म्हटली की, त्या गावात दोन—तीन एकर शेत रिकामे करून घेतल्या जात असे व किमान पंन्नास ते साठ हजार मानसे भजनाला जमत असे. यावेळेस गावची स्वच्छता तर व्हायचीच, घराच्या भिंती सुध्दा सारवून घरासमोर रांगोळयांनी सजावट करून सुसज्ज परिसर बनवायचे. हजारो मानसांचा समुदाय हा शिस्तीत व रांगेत भजनात बसून ती अमृतवाणी ऐकत असे व हा सुमधूर नाद हृदयात साठवून आलेला श्रोता हा आपल्या घरी परतत असे. कारण राष्ट्रसंतांचा हा संवाद लोकांना जीवाभावाचा वाटत असे. जमलेल्या हजारो मानसांकडून दोन्ही हात उंच करून वं. राष्ट्रसंत हे प्रथम त्यांच्याकडून भजन करून घेत व नंतरच आपली भजने सुरू करत.

''मेरा भजन तो कभी दम पकड पकडकर होता नही,

पुरा बख्खर और नागरही उसमे चलता है''

या त्यांच्या भजनातून मानसांच्या मनाची मशागत होत असल्याचे दिसते.

त्यांच्या खंजरी वादनाची पध्दत विशिष्ट तर होतीच शिवाय भजन म्हणण्याचीही पध्दत विशिष्ट होती. त्यांच्या डाव्या हातात खंजरी धरून पहिल्या तीन बोटांनी मर्यादीत पाणी लावून मुलायम केलेल्या खंजरीच्या कातड्यावर ते दाब देत व पाहिजे तो बोल उजव्या हाताने वाजवित. त्यांनी हे खंजरीवर काढलेले बोल व वाजविलेला मधूर ठेका सर्व श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत असे. खंजरीवर त्यांचे जीवापाड प्रेम होते. त्यांच्या खंजरीस लावलेली लहान घुंगरे तसेच तळहाताच्या आकाराच्या कास्याच्या झांजा या सर्व त्यांच्या स्वतःच्या कल्पना होत्या. एकदा असेच त्यांची खंजेरीची थैली रेल्वे प्रवासात हरविली असता त्यांनी सर्वांना उपवास करावयास लावला होता.

मेरी मिठी बजेगी खंजेरी किंवा सबसे उँचा है धन मेरा प्यारा भजन ।

इसपे सारा तनमन कुर्बान रहेगा ।।

या त्यांच्या भजनातून राष्ट्रसंतांचे प्रेम व्यक्त होत असल्याचे दिसते म्हणूनच ते त्यांच्या एका भजनातून म्हणतात, हे भगवान–

'दिल मनसे गाऊंगा तेरा भजन । ऊँचा उठा दे मेरा प्यारा वतन ।।

एकदा ते जपानला विश्वधर्म परिषदेसाठी गेले असता तेथे त्यांनी –

'हर देश मे तू । हर भेष मे तू । तेरे नाम अनेक, तू एकही है ।।

असे भजन गाऊन जेव्हा त्यांनी खंजरी वाजविली तेव्हा या विश्वधर्म परिषदेत उपस्थितांना वेड लागले असल्याचे समजते. त्यांना आध्यात्मिक भजने गाण्याचेही आवड होती. त्यांचे ''बंन्शी बजानेवाले तेरी बंन्शी बजा दे'' हे भजन एकदा सर्वांनीच ऐकावे असे वाटते. त्यांच्या आध्यात्मिक भजनातही त्यांना खंजरीची तंद्री लागून खंजरी वाजविली जात असे. राष्ट्रसंतांच्या खंजरी व भजनाने केवळ गावातच नव्हे तर देश पातळीवर दिल्ली निनादल्याचे दिसून येते. यावेळेस महाराजांच्या साथीला असणारी दिल्ली रेडीओ स्टेशनची वाद्य वाजविणारी मंडळी एवढी तल्लीन झाली होती की त्यांना काही वेळानंतर आपले वाद्य वाजविणेही सुचत नव्हते. गांधीजींना राजघाटावर अनेकदा श्रध्दांजली निमित्य तसेच राष्ट्रपती भवनात सुध्दा राष्ट्रसंताचे अनेकदा भजन होत असे. असे म्हणतात की, २४ एप्रिल १९४८ ला मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीच्या अधिवेशनाचा शुभारंभ वं. राष्ट्रसंतांच्या भजनाने खंजरी वाजवून झाला असल्याचे समजते.

तसेच महाराष्ट्राचे सांस्कृतिक दैवत असलेल्या पंढरपुरच्या वारीमध्ये अनेकदा त्यांनी न चुकता हजेरी लावून लक्षावधी वारकऱ्यांसमोर त्यांनी आपली भजने गाऊन अनेक वारकऱ्यांना मंत्रमुध्द् केले.

विठ्ठल रखुमायी घरी–दारी, पुंडलीक ही मुले गोजरी ।

त्यांना सेवेच फुल मी वाहिलं, माझ गावचं मंदीर शोभलं ।।

या त्यांच्या वाणीतून संपुर्ण वारकऱ्यांना पंढरपुरला वारीत आल्याचे समाधान तर झालेच, त्यांना राष्ट्रसंतांसारखा संत आपल्या खंजरीद्वारा भजन गाऊन लोक जागृती करणारा संत असल्याचा भास होतो.

इतकेच नव्हे तर नाशिकच्या कुंभमेळ्यातही अडीच लाख लोकांसमोर व हजारो साधुंच्या उपस्थितीत ते म्हणतात –

अंगी नाही ज्ञान म्हणजे साधू मला मान ।

साधू नावाने साधू होत नाही, असे भजन खंजरीच्या तालावर त्यांनी गाऊन अनेक साधूंचे डोळे उघडून खडबडून उडविली होती. साधू बद्दल ते सांगतात – साधू म्हणजे वेश नव्हे तर साधूत्व ही एक वृत्ती आहे असे सांगून त्यांना खऱ्या साधुत्वाची जाणीव करून द्यायची होती. कारण आपल्या भारत देशात अनेक साधूंचे मठ ठिकठिकाणी दिसून येतात. तेव्हा अशा या साधूंना राष्ट्रसंतांनी खऱ्या साधुत्वाची ओळख करून दिली. राष्ट्रसंतांच्या मंत्रमुग्ध वाणीतून व त्यांच्या खंजरीतून अनेक साधू प्रभावित झाल्याचे दिसून येते.

आंतरराष्ट्रीय युध्दसमयी सुध्दा राष्ट्रासंतांनी चिन ने केलेल्या आक्रमनाच्यावेळी ते आपल्या सिमेवर जाऊन लढणाऱ्या जवानांच्या मनात वीर भावना चेतविल्याचे दिसून येते. त्यांच्या या नित्याच्याच कार्यक्रमाचा समारोप खंजरी भजनाने होत असे. त्यामुळे खंजरी व खंजरी भजन हा त्यांचा जीव की प्राण होता. त्यांचे या खंजरीशी असलेले नाते जीवाभावाचे होते. यानंतर अशी खंजरी कुण्या दुसऱ्याला तितकीशी जमली नसेल पण तरीही त्यांचे अनुयायी सत्यपाल महाराजांसारखे समाज प्रबोधनकार पुढे आले व त्यांनी समाजाला राष्ट्रसंतांच्या खंजरीची व त्यांच्या भजनाची ओळख करून दिली. यासारखे प्रबोधनकार समाजात जन्माला येणे ही प्रत्येकच काळाची गरज असते. खंजरी भजन व खंजरी वाजविण्याची पध्दत येणाऱ्या अनंत काळापर्यंत कायम राहावी असे वाटत असेल तर शासनाने व समाजाने अशा प्रबोधनकारांचा उत्साह वाढवून राष्ट्रसंतांचे विचार समाजात जीवंत ठेवणे गरजेचे आहे. यातच खऱ्या अर्थाने देशप्रेमाची बिजे रोवली असल्याचे दिसुन येते.